Rotary
Rotary International
Dist. 3132

UNITE FOR GOOD

# रोटरी उमंग

October, November, December - 2025

## ROTARY CLUB OF LATUR HORIZON 2025-26

Club No. : 77032



**Rtn. Francesco Arezzo**
**RI President 2025-26**



**Rtn. Sudhir Lature**
**Dist. Governor 2025-26**



**Rtn. Dr. Gunvant Birdar**
**President**



**Rtn. Dhananjay Raut**
**Secretary**

रोटरी उमंग

## द्वितीय अंक
ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर 2025


- Table of Contents
- Editorial
- Message
- Rotary Run 2025-26
- लिव्हर तपासणी शिबिर
- Distribution of Incinirators
- Certificate - Rotary Quiz
- Rotary community corps, Nagzari
- Environment
- PELS and SELS Mumbai
- Rotary Leadership Institute (RLI)
- Weekly Meeting Fellowship, Birthday Celebration Photographs
- Seminar, Sambhajinagar (Rotary Asha Express) TRF Seminar, Ahilyanagar
- First Aid Distribution
- रोटरी आशा एक्सप्रेस, लातूर - आशेचा प्रवास, जीवनाशी संवेदनशील बांधिलकी
- रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझन व बियाँड व्हिजन फाऊंडेशनच्या वतीने पांढरी काठी व दिवाळी फराळ वाटप
- पूरग्रस्त कुटुंबातील बालकांना शालेय साहित्य आणि संगणक संचाचे वाटप


# संपादकीय मनोगत...



सर्व रोटेरियन मित्रांना नमस्कार!

रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझन 2025 - 26 वर्षाच्या दुसऱ्या त्रैमासिक 'रोटरी उमंग' अंकात आपले सर्वांचे हार्दिक स्वागत ! 24 × 7 या पद्धतीने अविरतपणे फिरणारे रोटरी चक्र सर्व रोटेरियन मित्रांना मैत्री, आनंद आणि सेवेची सतत प्रेरणा देत राहते. याच प्रेरणेने आपण सर्व रोटरी सदस्य सदैव समाजोपयोगी उपक्रम राबविण्यासाठी आणि सेवेसाठी तत्पर असतो. या तत्परतेने केलेल्या नवनवीन उपक्रमांची माहिती या वर्षातल्या दुसऱ्या त्रैमासिक 'रोटरी उमंग'च्या माध्यमातून मांडण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे.

दरम्यानच्या कालावधीमध्ये आपल्या क्लबच्या माध्यमातून संपन्न झालेल्या उपक्रमांचा परिणाम आणि त्याचा समाजावर पडलेला सकारात्मक प्रभाव याही अनुभवांचा उल्लेख यामध्ये करण्यात आला आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्याने आणि तसेच मार्गदर्शनाने आपल्या क्लबची यशोगाथा अशाच पद्धतीने प्रगतिपथावर चालत राहील. या अंकाच्या माध्यमातून आपण केलेल्या समाजसेवेचे कथन शब्दांच्या माध्यमातून व्यक्त करताना मला मनस्वी आनंद होत आहे. अशाच पद्धतीने आनंद, मैत्री आणि समाजसेवेसाठी आपण सदैव तत्पर राहूया ! यासोबतच आपली ही लेखनाची परंपरा अखंडितपणे चालू राहील यासाठी प्रयत्न करू.

धन्यवाद !

आपला,

**रो. डॉ. घनश्याम ताडेवार**

संपादक,

'रोटरी उमंग'

रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझन

## HAPPY BIRTHDAY

| | |
|---|---|
| Rtn. Dr. Madhav Ganpatrao Gore | 1 Oct. |
| Rtn. Dr. Gopikishan R. Bharadiya | 26 Oct. |
| Rtn. Dr. Hanmant Dadarao Wagalgave | 02 Dec. |

## Happy Wedding Anniversary

| | |
|---|---|
| Rtn. Ashish Babasaheb Kshirsagar | 06 Dec. |
| Rtn. Dr. Gopikishan R. Bharadiya | 11 Dec. |
| Rtn. Dr. Mallikarjun Dattatray Wakde | 29 Dec. |

# स्वाती हेरकल
## माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर | RI Dist. 3132

### संदेश



'आशा' ही एक अशी शक्तिशाली शक्ती आहे जी मनामनात बदल करू शकते, बदल प्रज्वलित करू शकते आणि जीवन बदलू शकते. या नवीन रोटरी वर्षात, आपण ही थीम मनापासून स्वीकारू या आणि आपल्या समाजामध्ये आणि त्यापलीकडे आशेचे किरण बनण्याचा प्रयत्न करू या. एकत्रितपणे आपण निःस्वार्थपणे सेवा करून चिरस्थायी प्रभाव पाडू शकतो.

आशा निर्माण करण्याच्या आपल्या प्रयत्नात, आजच्यापेक्षा खुप चांगल्या जगासाठी आपण आपल्या परिवर्तन प्रकल्पांवर लक्ष केंद्रित करू या. या शाश्वत सेवा प्रकल्पांद्वारे, आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी, नोकऱ्या निर्माण करण्यासाठी आणि उद्योजकतेला पाठिंबा देण्यासाठी आपण काम करू या. आपल्या सेवेच्या प्रयत्नात, आपण रोटरी फाऊंडेशनने बजावलेली महत्त्वपूर्ण भूमिका आपण विसरू शकत नाही. फाऊंडेशन आपल्याला ग्लोबल ग्रँट प्रोजेक्ट्सद्वारे प्रभावी प्रकल्प राबविण्यास सहाय्य करते. जगभरातील गरजूंच्या फायद्यासाठी आमचे योगदान जास्तीत जास्त वाढले जातील याची खात्री करून आपण एकत्रितपणे, उदारपणे योगदान देऊ या.

आपण हे लक्षात ठेवूया की आपल्यापैकी प्रत्येकामध्ये चांगले बदल करण्याची शक्ती आहे. आपल्या कृती कितीही लहान असल्यातरी आशेचे तरंग निर्माण करू शकतात जे दूरवर पोहोचतात. आपण इतरांना प्रेरणा देऊ या, समाजाला सशक्त बनवूया आणि जगात जो बदल पाहू इच्छितो तो करू या. तुमची तळमळ, समर्पण आणि सेवेची अतूट बांधिलकी मला सतत प्रेरणा देत आहे. एकत्रितपणे आपण निःस्वार्थपणे सेवा करू या, जगात आशा निर्माण करूया. आणि आपण स्पर्श करत असलेल्या प्रत्येक गोष्टींवर कायमस्वरूपी प्रभाव टाकू या.

रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझन यांनी, विवेकानंद मेडिकल फाऊंडेशन अँड रिसर्च सेंटर यांच्या सहकार्याने व रोटरी क्लब ऑफ लातूर मिड-टाऊन यांच्या अमूल्य सहभागातून, ग्लोबल ग्रँट अंतर्गत "रोटरी आशा एक्सप्रेस"ची निर्मिती केली. कॅन्सरचा प्रादुर्भाव कमी करणे, लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि योग्य वेळी निदान करून उपचाराची संधी अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवणे हे या प्रकल्पाचे मुख्य ध्येय. या उल्लेखनीय कार्याबद्दल माझ्या शुभेच्छा !

# रो. डॉ. विजयकुमार राठी
## माजी प्रांतपाल | अध्यक्ष - नॅब, लातूर



रोटरी क्लबचे माजी प्रांतपाल व नॅशनल असोसिएशन फॉर दी ब्लाईंड (नॅब) या संस्थेचे लातूरचे अध्यक्ष, महाराष्ट्राचे उपाध्यक्ष व 'नॅब'चे राष्ट्रीय कार्यकारी सदस्य. यांनी रोटरी क्लबच्या माध्यमातून अमेरिका, कॅनडा यासह २५ पेक्षा अधिक राष्ट्रांमध्ये भ्रमण करून लोकसंग्रह केला आहे. त्यांना आजपर्यंत अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. सॅनिटरी पॅड व त्याचे विल्हेवाट इन्सिनेटरच्या माध्यमातून करून स्त्रियांसाठी मोलाचे योगदान दिले आहे. हॅण्डमेड पेपर व इतर तत्सम व्यवसायात ते अग्रणी आहेत. हॅण्डमेड पेपर विषयाबद्दल यांना झेरॅस्टीयन (इस्राईल) येथून पीएच. डी. मिळालेली आहे.

# रो. डॉ. गुणवंत बिरादार
## अध्यक्ष | रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझन

### संदेश



नमस्कार मित्रहो,

आपल्या सर्वांच्या सहकार्य आणि प्रेरणेने आपण समाजोपयोगी प्रकल्प हाती घेतले आहेत. या वर्षात नवीन सदस्य वाढवणे, जास्तीत जास्त टीआरएफ जमा करणे, वेगवेगळे समाजोपयोगी कायमस्वरूपी प्रकल्प सीएसआर फंडातून, ग्लोबल ग्रँट 'रोटरी आशा एक्सप्रेस कॅन्सर व्हॅन'च्या माध्यमातून महिलांमधील कॅन्सरचे समूळ उच्चाटन करण्यासाठी आपले प्रयत्न सुरू आहेत व यात यशही येत आहे.

या वर्षी आपण कॅन्सर आजाराने ग्रस्त असलेल्या समाजातील घटकांसाठी 'रोटरी आशा एक्सप्रेस' सुरू केली आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिला, शहरी भागातील नागरिकांची कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराबद्दल जनजागृती करून, कॅन्सरचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. आतापर्यंत एकूण 1798 रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे. त्यापैकी 1007 महिला, 171 कोलोस्कोपी, 453 थर्मल स्क्रीनिंग करण्यात आले आहे. रोटरी आशा एक्स्प्रेस म्हणजे फिरते रुग्णालय असून, यास मिळालेला उत्तम प्रतिसाद पाहून मला मनस्वी आनंद होत आहे.

'रोटरी रन 2025' च्या माध्यमातून रोटरीची पब्लिक इमेज निर्माण करण्यासाठी तसेच टीआरएफसाठी फंड निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. यातून आपण 69100 रुपये रोटरी फाऊंडेशनला दिले आहेत. यासोबतच विवेकानंद हॉस्पिटलतर्फे प्रत्येक महिन्यातील दोन दिवस लिव्हर तपासणी शिबिराचे आयोजन केले जात आहे. विविध महाविद्यालये, शाळा, मुलींच्या वसतिगृहात इन्सिनेटरचे वाटप करण्यात आले. अतिवृष्टीमुळे विस्कळित झालेल्या ग्रामीण भागातील परिवारांना रोटरीच्या क्लब ऑफ लातूर होरायझनच्या वतीने पूरग्रस्त भागातील मुलांना शालेय साहित्याचे वाटप केले. दिव्यांग व्यक्तींना पांढरी काठी व दिवाळी निमित्त फराळाचे किट बियाँड विजन फाऊंडेशनतर्फे वाटप केले. असे विविध समाजोपयोगी उपक्रम रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझनच्या वतीने राबविताना माजी प्रांतपाल रो. डॉ. विजयभाऊ राठी, सर्व रोटरियन, रोटरी आशा एक्सप्रेस कमिटीचे रो. रवींद्र बनकर, रो. आशीष बाहेती, डॉ. गौरी कुलकर्णी, डॉ. राधेश्याम कुलकर्णी, दीपक टाकळीकर यांनी केलेले सहकार्य अनमोल आहे. त्यांचे मी मनापासून आभार मानतो.

Rotary
Rotary International
Dist. 3132

UNITE FOR GOOD









ROTARY RUN 2025-26







































**Project :**

## LIVER CHECKING CAMP (FIBROSCAN)

**Club :** RC of Latur Horizon
**President :** Rtn. Dr.Gunvant Biradar
**Secretary :** Rtn. Dhanajay Raut
**Project Chair :** Rtn. Baswraj Panure

**Description :** Our continuing project is of Fibroscan. We have started his project in Vivekanand Hospital under help cooperation and guidance Rtn.Dr.Gopikishan Bharadiya.Still this date from year 2023 every months.This camp is constantly in routine process.The beneficieries are 576 in this period and this project has very good response. This disease mainly occurred due to habit of drink of alcohol.Many times patient hesitating to get check-up. But we maintained the secrecy so the flow is slowly increasing. When any disease diagnosis at early stage the treatment can be implemented properly. Our this efforts warm too many patients that see this is your condition be aware and take care of your habit and health. All the tests are free of charge. In any other hospital if you want to test it will minimum Rs.5000 per patients. In this way our club serve to 476 patients and saved at least 2380000 Rs. A great achievements of our RC of Latur Horizon.



















लिव्हर तपासणी शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा:डॉ.गोपीकिशन भराडिया

फायब्रोस्कॅन - लिव्हर तपासणीसाठी मोफत शिबिर घेण्याचा उपक्रम **रोटरी क्लब ऑफ होरायझनच्या** माध्यमातून व **विवेकानंद हॉस्पिटलच्या** मदतीने जुलै 2025 पासून ते आजपर्यंत राबवत आहोत. लिव्हर अर्थात यकृत मानवाच्या शरीरातील अत्यंत महत्त्वाचा अवयव, यकृताची कार्यप्रणाली सुरळीत असेल तरच प्रत्येक व्यक्ती व्यवस्थित, निरोगी जीवन जगू शकते. आज मितीस बदलती जीवनशैली, खानपानाच्या बदलत जाणाऱ्या सवयींमुळे यकृताच्या विकारात वाढ होताना दिसते. आजच्या काळात वैद्यकीय उपचारही महागडे झाले आहेत. सामान्य परिस्थितीत दिवस कंठणारी व्यक्ती औषधोपचाराचा खर्च पेलू शकत नाही. लिव्हरचे आजार उद्‌भवू नयेत यासाठी वेगवेगळे उपक्रम या माध्यमातून राबविले जात आहेत. त्यात आतापर्यंत जवळपास 576 जणांची संपूर्ण लिव्हर तपासणी करण्यात आली. या तपासणीत असे निदर्शनास आले की, योग्य वेळी त्यांच्यावर उपचार नाही केले तर त्यांचे जीवन धोक्यात येऊ शकते. याउपर जनजागृतीसाठी व त्यांचे जीवनमान सुरक्षित रहावे म्हणून ही मोहीम आजही सुरुच आहे. फॅटी लिव्हर, अल्कोहोलिक लिव्हर, डायबेटिस, हाय कोलेस्टेरॉल, हेपॅटायटीस बी/सी असणाऱ्या रुग्णांवर त्वरित उपचार नाही केले तर परिस्थिती हाताबाहेर जाऊन रुग्ण दगावण्याची दाट शंका आहे. यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून जनजागृती करून सामान्यांचे जीवन सुधारण्याचा प्रयत्न अपेक्षित आहे.

**रो. डॉ. गुणवंत बिरादार**
अध्यक्ष

**रो. धनंजय राऊत**
सचिव



PROJECT

## DISTRIBUTION OF INCINIRATORS

**Club :** RC of Latur Horizon
**President :** Rtn. Gunwant Biradar
**Secretary :** Rtn. Dhanajay Raut
**Project Chair :** PDG. Vijay Rathi
**Description :** Our continuting very popular project o Incinirators distribution in Schools, Colleges, Hostels etc. In last two years more than 825 incinirators distributed in around latur and solapur district by the help and cooperation under CSR fund by Lulla Foundation, RPG and Glenmark pharmas. We joint the hands with NAB Latur. Now this project is taking shape slowly even at Chennai also this has been introduced. Rotary News also published in the news so we can understand what importance of this project particularly in pollution control. The results sheet will show how many girls had been benefted with this project.











# Certificate - Rotary Quiz

रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझनचे अध्यक्ष रो. डॉ. गुणवंत बिरादार यांनी सन 2025-26 मध्ये प्राप्त केलेले रोटरी क्विझ व रोटरी पीसचे सर्टिफिकेट.












**Project :**

## ROTARY COMMUNITY CORPS, NAGZARI

**Club :** RC of Latur Horizon
**President :** Rtn. Dr.Gunvant Biradar
**Secretary :** Rtn. Dhanajay Raut
**Project Chair :** Rtn. Mahadev Pande







सकाळ

मुरुड : रोटरी क्लबतर्फे नागझरीच्या शाळेतील विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करताना.

### नागझरीच्या विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप

मुरुड : रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझन यांच्यातर्फे नागझरी (ता. लातूर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत सायकलींचे नुकतेच वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष गफार पटेल होते. यावेळी रोटरी क्लबचे माजी प्रांतपाल डॉ. विजयभाऊ राठी, डॉ. गोपीकिसन भराडिया, तेजमल बोरा, विश्वनाथ स्वामी, गुणवंत बिराजदार, रोटरीचे अध्यक्ष महादेव पांडे, सचिव निळकंठ स्वामी, सरपंच श्रीराम सोळुंके, चेअरमन हंसराज पवार, मुख्याध्यापक जे.एस. वायगावकर आदी उपस्थित होते.

Aurangabad, Latur-Today
22/10/2024 Page No. 3









### रोटरी क्लब ऑफ लातूर होरिझोनच्यावतीने नागझरीच्या जि.प.शाळेत शालेय साहित्याचे वितरण

**लातूर,प्रतिनिधी**:रोटरी क्लब ऑफ लातूर होरिझोनच्यावतीने लातूर तालुक्यातील नागझरी येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना ,पेन तसेच प्रत्येक वर्गास एक या प्रमाणे सात डिजिटल बोर्ड अशा शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. तसेच यावेळी विद्यार्थ्यांना प्लास्टिक मुक्त अभियानाची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लब ऑफ लातूर होरिझोनचे अध्यक्ष विश्वनाथ स्वामी सावळे हे होते. याप्रसंगी विवेकानंद हॉस्पिटल, लातूरचे डॉ. गोपिकिशन भराडीया, रोटरीचे सचिव महादेव पांडे, रो.क्लबचे माजी प्रांतपाल डॉ.विजयभाऊ राठी, प्राचार्य डॉ.संजय गवई, प्रा. डॉ.गुणवंत बिराजदार, डॉ. बी. आर.पाटील, नागझरीचे सरपंच, उपसरपंच गफार पटेल, काकासाहेब पवार., हंसराज पाटील, बब्रुवान पवार, शिवाजी साळूंके, मोतीराम पवार, शाळेचे मुख्याध्यापक कामेगावकर, पाटील ,मोरे ,श्रीमती पाटील मॅडम,श्रीमती.देशमुख मॅडम,श्रीमती रणखांब मॅडम, श्रीमती शेख मॅडम, श्रीमती काळबांडे मॅडम आदींची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाईंच्या






# PROJECT

## ENVIRONMENT

**Club :** RC of Latur Horizon
**President :** Rtn. Dr.Gunvant Biradar
**Secretary :** Rtn. Dhanajay Raut
**Project Chair :** Rtn. Dr. Ratnakar Bedge
**Description :**
Awarness to avoid the plastic bags Distributed 1050 Cloth bags get stitched by ITI girls so they can earn while learn. Printed the bags. Save environment joint project with NAB Total Cost Rs. 10500





















# PELS and SELS Mumbai























THE ROTARY LEADERSHIP INSTITUTE
RECOGNITION OF SUCCESSFUL COMPLETION
PART 1 & 2
This is certify that
from R.C. Horizon 3132 et 3030, India
has successfully completed the Part 1 & 2 The Rotary Leadership Institute
held in Ahmedpur on 04 th Oct 2025.
Rtn Vishal Todchirkar
Rtn Sudhir Lature


THE ROTARY LEADERSHIP INSTITUTE
RECOGNITION OF SUCCESSFUL COMPLETION
PART 3
This is certify that
District 3132, India
has successfully completed the Part 3 of The Rotary Leadership Institute
held in Ahmednagar on 7th and 8th of October, 2025.
Rtn. Swati Herkal


THE ROTARY LEADERSHIP INSTITUTE
RECOGNITION OF SUCCESSFUL COMPLETION
FOT
This is certify that
District 3132, India
has successfully completed the FOT of The Rotary Leadership Institute
held in Ahmednagar on 7th and 8th of October, 2025.
Rtn. Swati Herkal










## दृष्टी (Zonal Seminar Public Image & Youth Service) क्षणचित्रे :








# Weekly Meeting Fellowship, Birthday Celebration Photographs















































maha headline
https://mahaheadline.blogspot.com
Editor : Abhay Lalwani 9890615255
Dt:19/12/2025

## District TRF Seminar and Global Grant Workshop Held Successfully in Ahilyanagar

**A.nagar | December 19, 2025|** The Rotary Club of Ahmednagar Central, Ahilyanagar, successfully organised the District TRF Seminar and Global Grant Workshop titled "KINDLE Igniting the Spirit of Giving" on Sunday at Badisajan Solitaire Hall on Arangaon Road.

The programme proved to be highly informative, visionary and inspiring for Rotarians across the district. A preparatory workshop conducted a day earlier at the Nagar Club by the Rotary District Team, along with the main TRF Seminar at Solitaire Hall, added significant value by strengthening participants' understanding of The Rotary Foundation (TRF) and Global Grants.

**Focus on Global Service and Grant Planning**

During the workshop, the complete process of preparing Global Grants was explained in a clear, simple and practical manner. Detailed guidance on the Do's and Don'ts of submitting grant applications was provided, while live examples on Need Assessment helped participants gain confidence in planning and executing impactful service projects.

District Governor Rtn. Sudhir Lature graced the programme and appreciated the efforts of all participating clubs. He also shared valuable insights on exploring CSR grant opportunities to enhance Rotary's service reach.

Strong Message on Global Grants and TRF

District Rotary Foundation Chairperson Rtn. Swati Herkal expressed her strong resolve to see at least 25 Global Grants being implemented, a vision that resonated strongly with the audience. The organising club assured its active support towards achieving this goal.

TRF Director Rtn. Harish Nayyer elaborated in detail on key aspects and precautions related to Global Grants, while DGSC Rtn. Ravindra Bankar extended consistent and enthusiastic support throughout the workshop.

**"KINDLE" Seminar Inspires Spirit of Giving**

The TRF Seminar under the KINDLE theme left a deep impact on participants. PRID Rtn. Dr. Mahesh Kotbaghi beautifully presented the concept of Yesterday/Today/Tomorrow through musical illustrations, effectively highlighting the spirit of giving. His rendition of "UNITE FOR DOING GOOD" filled the hall with positive energy.

Guidance shared by DGE Rtn. Jayeshbhai Patel, DGN Rtn. Kshitij Zaware, PDG Rtn. Harish Motwani, and Rtn. Varsha Pitti on TRF, Polio and Endowment matters proved highly motivating. Rtn. Dr. Milind Shah creatively expressed the essence of philanthropy through a poem by Bahinabai, earning wide appreciation.

Convener Rtn. Ishwar Bora presented an analytical overview of the programme, while Co-Convener Rtn. Prasann Khajgiwale efficiently handled logistics and coordination.

Rotary's Vision Reinforced

Our PDG Shirish Rayte also Attended truly inspired to all District,officers

The seminar strongly underlined the importance of Giving, Donor Development and People in Action as pillars for Rotary's bright future.

The programme commenced with a welcome address by Rtn. Sunil Kataria, President of the Rotary Club of Ahmednagar Central, who warmly welcomed all dignitaries, speakers and participants. Club Secretary Rtn. Amar Gurap proposed the vote of thanks, expressing gratitude to all participating clubs, organisers, speakers and Rotarians for making the event a grand success.

# FIRST AID DISTRIBUTION

रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझन व नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा बसवेश्वर महाविद्यालयास स्ट्रेचर, फर्स्टएड बॉक्स आणि व्हील चेअरचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी माजी प्रांतपाल डॉ. विजयभाऊ राठी, अध्यक्ष डॉ. गुणवंत बिरादार, रो. डॉ. संजय गवई, प्रा. विजय सोनी, प्रा. सदाशिव दंदे, रत्नेश्वर स्वामी, रो. रत्नाकर बेडगे, उपप्राचार्य नितीनकुमार वाणी, रो. महादेव पांडे, रो. नीळकंठ स्वामी, कार्यालयीन प्रमुख बेंदरगे, येरोळे मॅडम आदी.





















Rotary
Rotary International
Dist. 3132

UNITE FOR GOOD




# रोटरी आशा एक्सप्रेस, लातूर

# आशेचा प्रवास, जीवनाशी संवेदनशील बांधिलकी

कॅन्सर... एक असा शब्द की ज्याच्या उच्चारानेच मनात भीतीची छाया पसरते. आजच्या आधुनिक युगात हा आजार उपचारक्षम असला तरी "लवकर निदान" हा घटक अनेकांच्या जिवामध्ये जीवन-मरणाचा फरक निर्माण करतो. ग्रामीण भागात माहिती, तपासणी, सुविधेचा अभाव आणि जनजागृतीची कमतरता या सर्वांमुळे अनेक जीव निरपराधपणे हातचे जातात. या भीषण वास्तवाला बदलण्यासाठी, अंधाराला चिरून आशेचा दिवा पेटवण्यासाठी... रोटरीने पुढाकार घेतला! आणि या दिव्याचे नाव आहे - **"रोटरी आशा एक्सप्रेस"**

- ही फिरती कॅन्सर तपासणी बस म्हणजे केवळ यंत्रणा नाही, तर एक धडधडते हृदय आहे.
- मानवतेसाठी स्पंदणारे हृदय.
- जनजागृतीचा प्रकाश पसरवणारा दीपस्तंभ.
- आणि सर्वात महत्वाचे म्हणजे - प्रत्येक जीवाला नवी संजीवनी देणारा आशेचा प्रवास.

### आशेचा हा प्रवास कसा सुरू झाला?

**रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझन** यांनी, **विवेकानंद मेडिकल फाऊंडेशन अँड रिसर्च सेंटर** यांच्या सहकार्याने व **रोटरी क्लब ऑफ लातूर मिड-टाऊन** यांच्या अमूल्य सहभागातून, ग्लोबल ग्रँट अंतर्गत **"रोटरी आशा एक्सप्रेस"**ची निर्मिती केली. कॅन्सरचा प्रादुर्भाव कमी करणे, लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि योग्य वेळी निदान करून उपचाराची संधी अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवणे हे या प्रकल्पाचे मुख्य ध्येय.

### गावोगावी फिरत, दारोदारी पोहोचत...
### आशा एक्सप्रेसने दिली जीवनदायी सेवा :

२७ जून ते १५ नोव्हेंबर २०२५ या अवघ्या साडेचार महिन्यांत या बसने १३ ठिकाणी कॅम्प घेतले. गुबाळ, औसा, अंबाजोगाई, मुरुड, तिवटनगर, भातांगळी, कळंब, कॉईल नगर लातूर, उमरगा अशा अनेक भागांमध्ये ही बस पोहोचली - जेथे आरोग्याच्या सुविधा स्वप्नासारख्या वाटायच्या.

### या कॅम्पमधून :

- एकूण 1798 रुग्णांची तपासणी
- त्यापैकी 1007 महिला (63%) - महिलांची जागरूकता वाढत असल्याचे समाधानकारक चित्र दिसत आहे.
- 171 कॉलोस्कोपी, 453 थर्मल स्क्रीनिंग
- दर कॅम्पला सरासरी 94–100 रुग्ण
- रेफरल रुग्णांची संख्या लक्षणीय - 97 म्हणजेच वेळेवर उपचाराची नवी संधी!

यातील प्रत्येक संख्या एक जीव, एक कुटुंब, एक आशा दर्शवते. या कॅम्पमध्ये येणाऱ्या अनेकांच्या डोळ्यांमध्ये भीती असते... परंतु तपासणी झाल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा हलकासा दिलासा... तोच या उपक्रमाचे खरं यश!

ही बस म्हणजे फक्त 'बस' नाही... तर एक भावना आहे! ही रुग्णवाहिका म्हणजे फिरते रुग्णालय, फिरणारी जनजागृती मोहीम, आणि सर्वांत महत्त्वाचे - कॅन्सरविरुद्धच्या लढाईत लोकांना दिलेला आत्मविश्वास. डॉक्टर, नर्सेस, तंत्रज्ञ, स्वयंसेवक - या सर्वांनी मिळून एक अतिशय सक्षम आणि संवेदनशील टीम बनवली आहे. त्यांच्या प्रत्येक तपासणीमागे एक प्रामाणिक हेतू आहे... त्यांच्या प्रत्येक उपक्रमामागे मानवतेचा श्वास आहे. प्रवास सुरूच आहे... अजून खूप दूर जायचे आहे!

### या सेवायात्रेची पुढील पावले :

- १ नोव्हेंबर २०२५ – बुद्ध गार्डन, कॉइल नगर, लातूर (रोटरी क्लब लातूर मिड-टाऊन)
- १५ नोव्हेंबर २०२५ – उमरगा (रोटरी क्लब ऑफ उमरगा)
- आणखी अनेक गावांपर्यंत, आणखी अनेक कुटुंबांपर्यंत... ही बस पोहोचणारच.

### लातूर व परिसरातील सर्व रोटरी क्लबना मनापासून आवाहन :

- "रोटरी आशा एक्सप्रेस" ही आपल्या सर्वांची सेवा आहे.
- लातूर व परिसरातील सर्व रोटरी क्लबनी यामध्ये सक्रिय सहभाग घ्यावा.
- जास्तीत जास्त कॅम्प आयोजित करावेत.
- आपण घेतलेला प्रत्येक कॅम्प एखाद्या कुटुंबाला नवजीवन देऊ शकतो!
- कारण विश्वास एकच... आपण एकत्र आलो तरच – कॅन्सरवर विजय मिळवू शकतो!
- रोटरी म्हणजे सेवा, रोटरी म्हणजे संवेदनशीलता,
- रोटरी म्हणजे प्रकाश... आणि "रोटरी आशा एक्सप्रेस" म्हणजे आशेचा अखंड प्रवास!

### रोटरी आशा एक्सप्रेस कमिटी :

**रो. डॉ. विजयभाऊ राठी**
माजी प्रांतपाल

**- रो. डॉ. गुणवंत बिरादार**
फर्स्ट कॉन्टॅक्ट पर्सन तथा अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझन

**रो. रवींद्र बनकर**
डिस्ट्रिक्ट ग्रँट सब-कमिटी चेअर, 2025-26

**रो. आशीष बाहेती**
सदस्य

**डॉ. गौरी कुलकर्णी**
सदस्य

**डॉ. राधेश्याम कुलकर्णी**
सदस्य

**दीपक टाकळीकर**
कॅम्प को-ऑर्डिनेटर

# रोटरी आशा एक्सप्रेस लातूर



## विवेकानंद कॅन्सर ॲण्ड सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, लातूर

| कॅम्पचे ठिकाण | दिनांक | एकूण तपासणी | महिला | पुरूष | कोलोस्कोप | थर्मल स्क्रिनिंग | पुढील तपासणी करिता हॉस्पिटलला रेफर केलेल्या रुग्णाची संख्या | | दाताची तपासणी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गुबाळ | 27.06.25 | 41 | 27 | 14 | 1 | 21 | 0 | 1 | 0 | |
| निटुर | 08.07.25 | 133 | 89 | 42 | 4 | 22 | 0 | 4 | 0 | सौ. निर्मला सोमाणी |
| औसा | 22.07.25 | 87 | 78 | 9 | 9 | 13 | 0 | 4 | 0 | श्री. धनंजय |
| अंबाजोगाई | 26.07.25 | 145 | 50 | 95 | 4 | 25 | 0 | 5 | 0 | श्री. कपिल |
| टाकळी बर्दापूर | 02.08.25 | 87 | 38 | 49 | 0 | 5 | | 0 | 0 | श्री. दीपक टाकळीकर |
| अंबाजोगाई वसुंधरा प्रतिष्ठान व रोटरी क्लब | 16.08.25 | 70 | 30 | 40 | 2 | 11 | 0 | 6 | 0 | |
| श्री वीरभारत गणेशोत्सव समिती-2025 बोधे नगर, लातूर | 03.09.25 | 67 | 34 | 33 | 2 | 20 | 7 | 2 | 0 | श्री. मानकोसकर |
| मुरूड | 13.09.25 | 84 | 64 | 20 | 20 | 40 | 0 | 5 | 0 | डॉ. बाहेती |
| तिवटगाळ, ता. चाकूर, जि. लातूर | 19.09.25 | 78 | 41 | 27 | 2 | 30 | 0 | 6 | 0 | |
| भातांगळी ग्रामपंचायत, लातूर | 03.10.25 | 126 | 83 | 43 | 10 | 42 | 0 | 9 | 0 | श्री. परमेश्वर पाटील |
| कळंब, ता., जि. धाराशिव | 10.10.25 | 177 | 130 | 47 | 28 | 66 | 1 | 10 | 0 | गिरीश कुलकर्णी |
| कॉईल नगर | 01.11.25 | 107 | 83 | 24 | 54 | 1 | 0 | 0 | 0 | मोतीलाल शर्मा |
| उमरगा, जि. धाराशिव | 15.11.25 | 40 | 28 | 12 | 18 | 24 | 0 | 0 | 0 | श्री. धनंजय मेकुदले |
| कोरंगळा, ता. औसा | 25.11.25 | 89 | 39 | 57 | 0 | 0 | 37 | 0 | 0 | |
| धाराशिव | 06.12.25 | 39 | 10 | 47 | 17 | 39 | 0 | 0 | 0 | |
| हिप्परसोगा | 09.12.25 | 131 | 33 | 98 | 5 | 40 | 0 | 0 | 0 | |
| जानवळ | 15.12.25 | 128 | 86 | 42 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | |
| नारंगवाडी | 24.12.25 | 58 | 10 | 47 | 7 | 28 | 0 | 0 | 0 | |
| सलगरा | 27.12.25 | 107 | 38 | 65 | 0 | 24 | 0 | 0 | 0 | |
| **एकूण** | | **1798** | **1007** | **809** | **171** | **453** | **45** | **52** | **0** | |


















## रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझन व बियाँड व्हिजन फाऊंडेशनच्या वतीने

# पांढरी काठी व दिवाळी फराळ वाटप

रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझन व बियाँड व्हिजन फाऊंडेशन यांच्या वतीने जागतिक पांढरी काठी दिनाचे औचित्य साधून दिव्यांग बांधवांसाठी 100 पांढरी काठी व 100 दिवाळी फराळ किटचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास रोटरी डिस्ट्रिक्ट 3132 चे प्रांतपाल सुधीरजी लातुरे, सहायक प्रांतपाल रविशंकर हिंगणे, लातूर महानगरपालिकेच्या नगरसेविका शोभा पाटील, रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. गुणवंत बिरादार, प्रोजेक्ट चेअरमन रो. माधवजी गोरे, रो. महादेव पांडे आणि रो. नीळकंठ स्वामी आदी उपस्थित होते.































# पूरग्रस्त कुटुंबातील बालकांना शालेय साहित्य आणि संगणक संचाचे वाटप

Rotary
Rotary International
Dist. 3132

UNITE FOR GOOD

रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझन, बालहक्क सुरक्षितता कार्यक्रम, जि. लातूर व महात्मा बसवेश्वर प्राथमिक विद्यालय, जेवळी (ता. लोहारा, जि. धाराशिव) यांच्या वतीने पूरग्रस्त कुटुंबातील बालकांना शालेय साहित्य आणि संगणक संच वाटप करण्यात आले. याप्रसंगी पीडीजी रो. डॉ. विजयभाऊ राठी, रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझनचे अध्यक्ष डॉ. गुणवंत बिरादार, रो. बालासाहेब सूर्यवंशी, रो. आशीष बाहती, सचिव रो. धनंजय राऊत, रो. बस्वराज पनुरे, रो. रत्नाकर बेडगे यांच्यासह विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.













लोकमत



लातूर रोटरी क्लबच्या वतीने जेवळी येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

## श्री बसवेश्वर शाळेत शालेय साहित्य व गणवेश वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

**जेवळी :** लोहारा तालुक्यातील जेवळी येथील श्री बसवेश्वर प्राथमिक शाळेत लातूरच्या रोटरी क्लब ऑफ हॉरायजन यांच्याकडून गरीब विद्यार्थ्यांना गणवेश व गुणवंत विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले.

अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अशोक भुसणे तर प्रमुख पाहुणे म्हणून रोटरीचे अध्यक्ष प्रा. गुणवंत बिराजदार, सचिव धनंजय राऊत, प्रा. रत्नाकर बेडग, प्रोजेक्ट चेअरमन प्रा. बसवराज पनुरे, शालेय समिती सभापती ईरप्पा डिग्गे यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित या उपक्रमात गरजू तीस विद्यार्थ्यांना गणवेश व बारा गुणवंत विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे यावेळी वाटप करण्यात आले. जेवळीतील सामाजिक कार्यकर्ते वैजिनाथ हावळे यांनी देखील स्वखर्चाने प्राथमिक शाळेतील तीस गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना गणवेश वाटप केले. कार्यक्रमास मुख्याध्यापक एम.वाय. भोसले, पी.सी. बनसोडे, आर.व्ही. पाटील, आदी उपस्थित होते.

## जेवळी येथील विद्यार्थ्यांना गणवेश, स्कूलबॅगचे वाटप



**लोहारा:** तालुक्यातील जेवळी येथील श्री. बसवेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात रोटरी क्लबच्या वतीने गरजु विद्यार्थ्यांना गणवेश व स्कूल बॅग वितरित करण्यात आल्या. तसेच शाळेसाठी संगणक भेट देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अशोक भुसणे-पाटील, तर प्रमुख पाहुणे म्हणून बसवराज पणुरे, इराप्पा डिग्गे, रोटरी क्लबचे अध्यक्ष गुणवंत बिराजदार, धनंजय राऊत, विभाग प्रमुख रत्नाकर बेडगे यांची उपस्थिती होते. यावेळी श्री. बेडगे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळेच्या कामकाजासाठी उत्तम सोय व्हावी तसेच नवनवीन तंत्रज्ञानाने विकास साधला जावा या उद्देशाने रोटरी क्लबने प्रशालेला संगणक संच भेट दिला. यावेळी माजी विद्यार्थी महेश सुरवसे, मारुती मडोळे, राहुल दांडेकर, वैजनाथ हावळे-पाटील, अभिजीत कारभारी, पृथ्वीराज सोळसे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर. व्ही. पाटील तर आभार मुख्याध्यापक एम. वाय. भोसले यांनी मानले.

दिव्य मराठी

धाराशिव जिल्हा

## रोटरी क्लबकडून शाळेला संगणक संच; गरजू विद्यार्थ्यांना गणवेश, बॅगचे वाटप



**लोहारा ।** रोटरी क्लब ऑफ लातूर हॉरायजनथर्फे लोहारा तालुक्यातील जेवळी येथील श्री बसवेश्वर विद्यालयाला जिल्हा कल्याणकारी फंडांतर्गत संगणक संच देण्यात आला. तसेच या कार्यक्रमात रोटरी क्लब ऑफ लातूर हॉरायझनतर्फे शाळेतील गरीब व हुशार ३० विद्यार्थ्यांना गणवेश व स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. यावेळी रोटरी क्लब ऑफ लातूर हॉरायजनचे अध्यक्ष प्रा. गुणवंत बिराजदार, सचिव धनंजय राऊत, रोटरियन प्रा. रत्नाकर बेडगे, प्रोजेक्ट चेअरमन प्रा. बसवराज पणुरे, संस्थाध्यक्ष अशोक भुसने, शालेय समितीचे इरप्पा डिग्गे, मुख्याध्यापक भोसले, पर्यवेक्षक, आर. व्ही. पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन आर. व्ही. पाटील यांनी केले तर मुख्याध्यापक भोसले यांनी आभार मानले.


Rotary

This Certifies that the Rotary Club of

**Latur Horizon, Maharashtra, India**

having been duly organized and having agreed, through its officers and members, to be bound by the constitution and Bylaws of Rotary International, which agreement is evidenced by the acceptance of this certificate, is now a duly admitted member of

Rotary International

and is entitled to all the rights and privileges of such membership. *In witness whereof* the signature of the Rotary International President, being duly authorized, is subscribed hereto this thirtieth day of August 2018

*(Original charter issued 22 August 2007, during the term of Wilfrid J. Wilkinson, President)*

PRESIDENT, ROTARY INTERNATIONAL


















Rotary
Rotary International
Dist. 3132

UNITE FOR GOOD

# ROTARY CLUB OF LATUR HORIZON

## Board of Directors 2025-26



**Rtn. Francesco Arezzo**
RI President 2025-26



**Rtn. Sudhir Lature**
Dist. Governor 2025-26



**Rtn. Ravishankar Hingne**
Asst. Governor 2025-26



**Rtn. Dr. Gunvant Biradar**
President



**Rtn. Dhananjay Raut**
Secretary



**Rtn. Ashish Baheti**
Vice - President



**Rtn. Mahadev Pande**
Immediate past President



**Rtn. Mahadev Gore**
President Elect



**Rtn. Nilkanth Swami**
Treasure



**Rtn. Balasaheb Suryawanshi**
Director Club Trainer



**Rtn. Vijaybhau Rathi**
Director The Rotary Foundation



**Rtn. Baswraj Panure**
Director Membership Development



**Rtn. Dr. Sanjay Gavai**
Directr Human Development



**Rtn. Gopikishan Bharadiya**
Director Community Services



**Rtn. Vijaybhau Rathi**
Director International services



**Rtn. Siddhling Gujar**
Director Vocational Service



**Rtn. Geetanjali Biradar**
Director Youth Service



**Rtn. Vilas Lute**
Director in Media